# समज-गैरसमज

(लघुकथा, काव्यसंग्रह)



श्री. दत्तात्रय कृष्णा निकम

# समज-गैरसमज

(लघुकथा, काव्यसंग्रह)

श्री. दत्तात्रय कृष्णा निकम

ई साहित्य प्रतिष्ठान

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर **खर्च** करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

# समज गैरसमज

## लेखक : दत्तात्रय कृष्णा निकम

श्री. दत्तात्रय कृष्णा निकम

अ / ४०४, चंदन , मैत्री वाटिका ,

परसिकनगर,जुना मुंबई पुणे रोड,

कळवा, ठाणे-४००६०५

फोन नं. ९८१९१६६८१५

E-mail: dkn28379@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmaaail.com

©esahity Pratishthan®2018

प्रकाशन : २० जानेवारी २०१८

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# मनोगत

आजच्या या औद्योगिक क्रांतीने झपाटलेल्या दुनियेत सगळे प्रगतीच्या धावपळीत व्यस्त आहेत. त्यातून प्रत्येकाचे राहणीमान व अपेक्षांचे ओझे वाढलेले आहे.त्यामुळे प्रत्येकाची मानसिकता बदलत



चालली आहे. मनावरील तणाव वाढत चालला आहे, त्यामुळे मनाचा व बुद्धीचा ताळमेळ सुटत चालला आहे. काही प्रमाणात आपले आयुष्य जगण्याची कला विरळ होत चालली आहे. मग त्यातून होणार वेळेचा अभाव, स्वतः साठी न मिळणारा वेळ आणि अशी बरेच कारणे असतील ज्याच्यामुळे निर्माण होतात समज-गैरसमज ! .....आणि त्यानुसार आयुष्य जगले जात आहे. मग आपल्या जवळच्या व्यक्तीपासून आपण दूर होत चाललो आहोत....कदाचित आपल्या कळत नकळत. आयुष्य फार सुंदर



आहे ते जगण्याची सुद्धा एक कला आहे परंतु ही कला लुप्त होत चालली आहे. कारणे काहीही असोत..पण मला जाणवलेले एक कारण वाटते ते म्हणजे होणारे समज-गैरसमज ! तसे समज-गैरसमज ह्यांचे वेग-वेगळे प्रकार आहेत. धर्म, वर्ण, कर्म, खाण्याचे, मैत्रीपूर्ण, सामाजिक, असे अनेक प्रकार.

हा विषय वाटतो तसा वाटायला सोपा असेल परंतु तसे नसल्यामुळेच हा प्रकार लिहायचे ठरवले. हा प्रकार साध्या व सरळ पद्धतीने मांडण्यासाठी एक नाटकीय परिसंवाद किंवा मग लघुकथा,काव्यसंग्रह आपणासमोर सादर करणार आहोत.

चला तर मग अनुभव करूया ....समज-गैरसमज विषयाचा !



अर्पण पत्रिका

माझ्या विचारांशी सहमत असणाऱ्यांना आणि ज्यांच्यामुळे हे लिहिण्याचा उद्देश मिळाला त्यांच्यासाठी.

मी मराठी,

श्री. दत्तात्रय कृष्णा निकम,

## अनुक्रमणिका


१. लघुकथा : समज-गैरसमज

२. काव्य : नेमके काय असतात हे गैरसमज ?

३. लघुकथा : समज-गैरसमज - दिवाळी सणाचे

४. लघुकथा : गैरसमज


५. सुविचार कथा : समज-गैरसमज

६. आभार : समज-गैरसमज

# १. लघुकथा : समज-गैरसमज

हा परिसंवाद आपणा समोर नाटकीय रूपाने सादर करीत आहेत. हे नाटकीय सादरीकरण सोसायटीच्या गणेशोत्सवा दरम्यानच्या सांस्कृतिक कार्यक्रमातील आहे.

प्रस्तावना : मैत्री वाटिका सोसायटी येथे सांस्कृतिक कार्यक्रम चालू आहेत. एक बालनाट्य सादर झालेले आहे. रंगमंचावर लाईट बंद आहे आणि पडदा पडलेला आहे. परिसंवाद सादरीकरणाची तयारी चालू आहे. रंगमंचावर संवादासाठी पप्पा (बाबा) आणि त्यांचा ७ वर्षाचा मुलगा (शुभम) ही पात्रे सूट घालून तयार आहेत, एक टेबल, दोन खुर्च्या, टेबलावर कापड पसरवले आहे, त्यावर पिण्यासाठी पाण्याने भरलेला तांब्या आणि फुलपात्र, संवादासाठी एक माईक आणि लागणारे इतर साहित्य.



**प्रसंग:** परिसंवादाच्या सादरीकरणा करिता पप्पा व शुभम , टेबलावर स्थिर-सावर होऊन परीसावादासाठी तयार बसले आहेत. लाईट, कॅमेरा अँड अक्शन ....पडदा उघडला जातो ..समालोचन सुरुवात



**[पप्पा]** : नमस्कार मंडळी ! आज आम्ही आपणासमोर आजचा कार्यक्रम घेऊन येत आहे “ समज- गैरसमज ” एक परिसंवाद.

ह्या सदरात सादर करण्यात येणारे विचार काल्पनिक व लेखनाचे स्वतः चे आहेत आणि त्यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही. जर आपणास यात काही साम्य आढळल्यास तो एक निव्वळ योगायोग समजावा आणि दुसरे काही नाही. ह्यातून कोणाच्याही भावना दुखावण्याचा हेतू नाही. चला तर मग पाहूया आजचा परिसंवाद " समज- गैरसमज"..

इतक्यात खिडकीतून गाण्याचा आवाज- यहा के हम सिकंदर...रखे सब को अपनी जेब के अंदर !

**[शुभम]** : पप्पा ! पप्पा ! हम है सिकंदर म्हणजे काय?

**[पप्पा]** : हे बघ ! येथे काही लोकांचा असा समज आहे की येथे आपल्या सारखे कोणी नाही. आपण सांगू तसे लोक वागतील आणि सर्व काही आपल्या मनासारखे होईल. तर हा त्यांचा समज परंतु असे काही नसते.

**[शुभम]** : अच्छा ! असं आहे तर.

**[पप्पा]** : बाकी कसं काय चाललं आहे?

**[शुभम]** : मस्त पप्पा, सर्व ठीक आहे . एक विचारू का?

**[पप्पा]** : विचार ना बेटा !

**[शुभम]** : इन्शुरन्स म्हणजे काय हो? एकदा सांगा ना प्लिज... प्लिज.

**[पप्पा]** : अरे हो ! हो ! सांगतो थांब जरा, आता ह्याला नेमके काय बरे सांगायचे. ऐक नीट लक्ष देवून. आज काल आपण घराचा इन्शुरन्स, लाईफ इन्शुरन्स, हेल्थ इन्शुरन्स, कार इन्शुरन्स आणि असे बरेच इन्शुरन्स घेतो परंतु ह्या धावपळीच्या जीवनात आपण एकमेकांच्या विश्वासाचा इन्शुरन्स करण्याचे विसरून गेलो आहोत.

आपण आपल्या वर असणाऱ्या विश्वासाची काळजी घेतली पाहिजे.

**[शुभम]** : ओह, ओके ! ओके ! खूप छान, आणखी एक विचारू का पप्पा.

**[पप्पा]** : बोला चिरंजीव.

**[शुभम]** : काय म्हणाला ? विचारू मग सांगा स्वच्छता अभियान म्हणजे नेमके काय?

**[पप्पा]** : आता ह्याला नेमके काय बरे सांगायचे, हं ! हं ! अरे विसरलास का तुम्ही गेल्यावर्षी नाटक नव्हते का केले.

**[शुभम]** : हो ! हो ! आठवले, पप्पा खूप मजा आली होती, नाटक करताना.

***पप्पांच्या नाटकातील आठवणींना शुभम मागून कोरस सारखी साथ देत होता.***

**[पप्पा]** : घरातला कचरा घराच्या खिडकीच्या बाहेर, फळांची साले घराच्या बाहेर, चपातीचे तुकडे घराच्या बाहेर, आपल घर कसं स्वच्छ ! मग सगळा कचरा सोसायटीच्या आवारात, कचरा साफ करायला आहे आपला कचरेवाला.

जसे प्रत्येकाला वाटते की आपले घर कसे अगदी स्वच्छ राहायला पाहिजे तसेच मित्रानो आपली सोसायटीसुद्धा स्वच्छ राहायला हवी कि नको ?

***....इतक्यात प्रेक्षकाधून हो ! हो ! अगदी बरोबरच्या घोषणा.***

**[पप्पा] :** समजले का रे बेटा.

**[शुभम] :** समजले पप्पा, पण आणखी एक विचारू का ?

**[पप्पा] :** विचार बेटा.

**[शुभम] :** पप्पा,पप्पा मैत्रीवाटिका म्हणजे काय हो ?

***प्रेक्षकावर्ग, जिद्यासू वृतीने म्हणा किंवा मग उत्सुकतेने ह्या प्रश्नाच्या उत्तरासाठी रंगमंच्याकडे टक लावून बघत.***

**[पप्पा] :** मला सांग तुला काय वाटते ?

**[शुभम] :** मैत्रीची वाट लागते...बरोबर ना पप्पा !

***प्रेक्षकांमध्ये हश्या आणि टाळ्यांचा कडकडाट***

**[पप्पा] :** नाही रे बाळा ! मैत्री वाटिका म्हणजे आपली " प्रेमनाथची " [*सोसायटीचे माजी सरचिटणीस* ] ....[***प्रेक्षकांमध्ये हश्या आणि टाळ्यांचा कडकडाट].*** अरे ! रे ! बघितले मी सुद्धा ना....म्हणजे प्रेमाची सोसायटी, जिथे सगळे वातावरण कसे मैत्रीपूर्ण, मंगलमय- पवित्र आणि आनंददायी. हो पण हल्ली ते कमी झाल्यासारखे वाटते आहे ...[***प्रेक्षकांमध्ये हश्या आणि टाळ्यांचा कडकडाट].*** परंतु मला खात्री आहे होईल सगळे ठीक हळू हळू.

**[शुभम] :** हो ! होईल बरोबर, गणपती बाप्पा मोरया !

**[पप्पा] :** मला वाटते आता चालूया आपण निरोप घेवूंया सगळ्यांचा, तुझे आता प्रश्न संपले असतील.

**[शुभम] :** पप्पा , एक शेवटचे.

**[पप्पा] :** आणखी आहेत का प्रश्न बेटा? पण आता हा शेवटचा प्रश्न बरं का.

**[शुभम] :** एकदम ओके, डन पप्पा ! ... पप्पा समज-गैरसमज म्हणजे काय ?

**[पप्पा] :** समज म्हणजे आपणास जे दिसते वाटते त्यानुसार आपण त्याचा अर्थ लावतो, परंतु आपणास जे दिसते त्या प्रसंगावरून आपण त्याचा अर्थ लावत असतो तोच असतो गैरसमज.

**[शुभम] :** Pappa ! make it little simpler.

**[पप्पा] :** ओके ! बघ आज आपण ह्या परिसंवादासाठी सर्वांसमोर सूट मध्ये आलो हा त्यांचा समज.....[***इतक्यात पप्पा आणि शुभमखुर्चीवरून उठून प्रेक्षकांच्या समोर उभे राहतात, ते बघून प्रेक्षकवर्ग हसून, टाळ्या वाजवत भर-भरून प्रतिसाद देतात***] ह्यातूनच निर्माण होतात गैरसमज कारण आपण ते कोट आणि हाफ पॅन्ट मध्ये आले आहोत. ह्यात तसा जास्त फरक नाही जसी हाफ पॅन्ट आणि फुल पॅन्ट...तर मित्रानो एकच सांगावेसे वाटते, समज- गैरसमजात जगायचे किंवा मग समजून गैर वागायचे आता तुम्ही ठरवा...



धन्यवाद ! रंगमंच्याचा पडदा खाली पडतो आणि मग आयोजक समिती तर्फे माईक हातात घेत सगळ्यांचे आभार ..हा परिसंवादाचा कार्यक्रम संपला असे जाहीर केले.

[शुभम],[पप्पा- दत्तात्रय कृष्णा निकम]

## २. काव्य : नेमके काय असतात हे गैरसमज ?

नेमके काय असतात हे गैरसमज ?

प्रत्येकाच्या मनात घर करणारे,
निळ्या आकाश्यात निराशेचे काळे ढग आणणारे,
उमेदीच्या संगतीत विसंगती घडवणारे,
नेमके काय असतात हे गैरसमज ||१||

जन्माच्या ऋणानुबंध धाग्यांना कात्री लावणारे,
मैत्रीच्या अतूट नात्यांना गोत्याय आणणारे,
मनात शंकेची पाल चुकचुक करणारे,
नेमके काय असतात हे गैरसमज ||२||

संगणकाची सिस्टिम बिघडविणारे व्हायरस असतात,
नाजूक नात्यातील विचारांची केमिस्ट्री बिघडविणारे रसायन असतात,
नेमके काय असतात हे गैरसमज ||३||

चिंचेच्या झाडाप्रमाणे आंबट चव निर्माण करणारे,
गुलाबांच्या प्रेमळ कात्याप्रमाणे बोचणारे,
व्यक्तिमत्वाच्या डोंगरात दरी निर्माण करणारे,
नेमके काय असतात हे गैरसमज ||४||

भिन्न विचारांच्या लढतीत जिंकणारे,
सुन्न मनाचा घात करणारे,
हृदयातील भावनांचा भेद करणारे,
नेमके काय असतात हे गैरसमज ||५||

जीवभावांच्या मैत्रीत मोज माप करणारे,
कर्तुत्वाला मूठ माती देणारे,
एक लाथ दोन तुकडे करणारे,
सुक्या लाकडात आगेची ठिणगी टाकणारे,
नेमके काय असतात हे गैरसमज ||६||

शेवटी न उमगणारे, गुंतत जाणारे,
मनाला सलत ठेवणारे,
एक ना धड भराभर चिंध्या करणारे,
नेमके काय असतात हे गैरसमज ||७||

© दत्तात्रय निकम, कळवा, ठाणे

असे निरर्थक असतात हे गैरसमज, ह्यातून काहिही साध्य न करणारे, एकमेकांना एकमेकांपासून दूर करणारे, बोरीच्या काट्याप्रमाणे अलगद टोचणारे, असे असतात हे गैरसमज.

आता तुम्हीच ठरवा समज-गैरसमजात जगायचे, की त्यापासून दूर राहून समजून वागायचे.

# ३. लघुकथा : समज-गैरसमज - दिवाळी सणाचे

प्रत्येक सणाचं एक वेगळे महत्व आहे आणि त्या मागचा हेतू सुद्धा वेगळा असतो. जसे प्रत्येकसाठी सण महत्वाचे असतात तसे ते साजरे करण्याच्या पद्धती सुद्धा वेगवेगळ्या असू शकतात.असे म्हणतात की भारतीय सणांना वैज्ञानिक दृष्टिकोन आहे, उदाहरणादाखल म्हणजे मकर संक्रांत, होळी, दिवाळी, दसरा आणि श्रवण मास ह्यांचा मागे खान-पान, सजावट, राहणीमान, पिक-पाणी आणि हे सण साजरे करताना वेगळा आनंद असतो. इथे कोणत्या एका धर्माचा सण मोठा वगैरे काही नसते. भारतीय संस्कृतीत सर्व धर्म आपले सण त्यांच्या पद्धतीने साजरे करतात. सद्य परिस्थितीला सर्व ठिकाणी दिवाळी ची तयारी चालू आहे.





दिवाळी म्हटलं की, सगळीकडे उत्साहाचं वातावरण पहायला मिळतं. आवराआवर, रंगरंगोटी नुसती धामधूम सुरु असते. नव्या कपड्यांची, दागिन्यांची, घरातील वस्तूंची खरेदी तर मोठी पर्वणीच असते. फटाक्यांची आतिषबाजी अन् चविष्ट दिवाळी फराळाचा स्वाद हे या सणाचं आणखी एक वैशिष्ट्य.






मग नवीन कपड्याची खरेदी असो, किंवा मग दिवाळीचा फराळ असो, किंवा मग रांगोळी सजावट असो किंवा मग दिवाळी पहाटेचे कार्यक्रम असोत, किंवा मग तोरणाची रोषणाई असो, किंवा मग दिवाळी दीप प्रज्वलन

असो अश्या लगबघित हा सण साजरा होतो. आप्तेष्ट, मित्रमंडळी किंवा नातेवाईक याना दिवाळीचा फराळ देणे, एक धम्माल मस्तीचा कार्यक्रम असतो.

दिवाळीचं दुसरं नांव दीपावली. हा उत्सव म्हणजे दीपोत्सव. दिवाळीची सुरुवात वसुबारसेपासून होते आणि भाऊबीज साजरी केल्यानंतर दिवाळीची सांगता होते. चला तर आज दिवाळी आणि त्यातील सणाचं महत्व जाणून घेऊयात...





यंदाच्या दिवाळी सणांचा तपशील खलील प्रमाणे. .......दिपावलीच्या खूप खूप शुभेच्छा.... !!!!!

**१६ ऑक्टोबर २०१७ : वसुबारस !**

गाय आणि वासारच्या अंगी असणारी उदारता, प्रसन्नता, शांतता आणि समृद्धी आपणास लाभो !

**१७ ऑक्टोबर २०१७ : धनत्रयोदशी !**

धन्वंतरी आपणावर सदैव प्रसन्ना असू देत !

निरामय आरोग्यदायी जीवन आपणास लाभो ! धनवर्षाव आपणाकडे अखंडित होवो !

**१८ ऑक्टोबर २०१७ : नरकचतुर्दशी !**

सत्याचा असत्यावर नेहमीच प्रभाव असावा !

अन्यायाचा प्रतिकार करण्याच बळ आपल्याला लाभो !!

आपल्याकडून नेहमी सत्कर्म घडो ! आपणास स्वर्ग सुख नित्य लाभो !!

**१९ ऑक्टोबर २०१७ : लक्ष्मिपुजन !**

लक्ष्मीचा सहवास आपल्या घरी नित्य राहावा ! नेहमी चांगल्या मार्गाने आपणास लक्ष्मी प्राप्त होवो ! लक्ष्मीपूजनाचे भाग्य आपल्याला नेहमीच लाभो ! घरची लक्ष्मी प्रसन्न तर सारे घर प्रसन्न !

**२० ऑक्टोबर २०१७ : पाडवा अर्थात बलिप्रतिपदा !**

पाडवा आगमनाने आपल्या आयुष्यात सदैव गोडवा यावा !

सत्याचा असत्यावरचा विजय नेहमीच नव्याने प्रेरणा देत राहो ! थोरा मोठ्यांचे आशीर्वाद आपल्याला मिळत राहो !

**२१ ऑक्टोबर २०१७ : भाऊबीज !**

जिव्हाळ्याचे संबंध दर दिवसागणिक उजळत राहू दे ! भावा-बहिणीची साथ आयुष्यभर अतूट राहो दे !

ही दिवाळी आपणास आणि आपल्या कुटुंबास आंनदाची आणि भरभराटिची जाओ. प्रामुख्याने ही दिवाळी शालेय विद्यार्थ्यांना सुट्टीचा सण असतो, दिवाळीचा अभ्यास, किल्ले बनविणे, सकाळी उठून उठणे लावून अभ्यंग स्नान करून फटाके वाजवायला जाणे. सध्या स्थितीला ह्यातील बऱ्याचशा गोष्टी कमी झालेल्या आहेत असे जाणवते.






सगळीकडे बऱ्याच प्रमाणात दिवाळीच्या शुभेच्छा सुद्धा व्हॅटस-अँप वर दिल्या जातात, खूप कमी प्रमाणात लोक वैयक्तिक भेटून शुभेच्छा देणे कमी झालेल्या आहेत. हल्लीचे सण साजरे करणे एक फॅशन झाली आहे, ना कोणाकडे जाणे किंवा जाउन एकत्र फराळ करणे ही कला लुप्त होत चालली आहे.




सध्या सोशल मीडियाचा वापर खूप होत आहे मग फेसबुक असो, ट्विटर असो, व्हॅटस-अप असो शुभेच्छा सोशल माध्यमाने आणि असे बरेच काही. ह्याचे जसे फायदे आहेत तसे तोटे सुद्धा आहेत बराक.. आजच्या घडीला सोशल मीडियावर प्रत्येक गोष्टीवर प्रतिक्रिया दिल्या जातात ...आलेले मेसेजेस एक मेकांना पुढे

पाठवत आपले काम संपले अशी वृत्ती वाढायला लागली आहे.  काही योग्य किंवा अयोग्य याचा विचार न करता लोक मेसेज पुढे पाठवतात , मग त्याने होणारे समज-गैरसमज यांचा विचार सुद्धा मनात येत नाही.

आज काल फेसबुक वर प्रदुषण मुक्त दिवाळी ! ह्या विषयवार मतप्रदर्शन चालू आहे.

**[तपशील] :** कुठल्या तरी धर्माचे लोक त्यांच्या सणासुदीला फटाके फोडतात आणि ईतरही अशीच थातुरमातुर कारणे देउन हिंदुंवरच फटाक्यांची बंदि का? असा सवाल आजकाल विचारला जातोय. खरंतर हिंदुंच्या कोणत्याही धर्मग्रंथात "दिपावली दिवशी पुजन करून फटाक्यांची आतषबाजी करावी" असे लिहलेलं नाही. किंबहुना कोणत्याही धर्मग्रंथात फटाके ही धार्मिक बाब नसावी कारण प्राचीन काळी जेव्हा धर्मग्रंथ लिहले गेले तेव्हा फटाक्यांचा शोध लागला नव्हता.

राहता राहीला प्रश्न हिंदुच्या फटाके फोडण्याचा तर मला वाटत हा हिंदुस्तान आहे म्हणजे बहुसंख्येने येथे हिंदु राहतात. म्हणजे ईतर धर्माचे बाकिचे सगळे उपरे आहेत (खरंतर असं नाहीये पण ते तुर्तास राहुदे). तर हा आपल्या हिंदुचा देश आधीच खुप समस्यांचा सामना करतोय ज्यात प्रदुषणाची समस्या खुप मोठी आहे. हवेचं, पाण्याचं आणि आवाजाच प्रदुषण. आणि फटाक्यांमुळे आवाज आणि हवा दोन्ही प्रदुषित होतात.

तर हिंदुंनी फटाके नाही फोडले तर ते एक राष्ट्रकार्यच असेल. फटाक्यांमुळे वृध्द, विद्यार्थी आणि पशु-पक्ष्यांना सुध्दा त्रास होतो. आणि फटाके न वाजवुन आपला धर्म काही बुडत नाही. त्यांनी केलं म्हणुन आपणही तेच करायच ही मानसिकता तर सोडूनच द्या. हिंदु या महान धर्माला (नव्हे जीवन शैलीला) कुणाच अनुकरण करायची गरज नाहीये.

चला तर या वर्षी फटाके मुक्त दिवाळी साजरी करूया आणि राजकारण्यांचे वरदहस्त लाभलेल्या किंबहुना त्यांच्याच मालकिच्या असणा-या मोठया मोठ्या दुकानांना तोट्यात पाडुया....

मला मुद्दाम इथे एक मुद्दा सादर करावासा वाटतो आपले विचार किती ग्रासलेले आहेत. एकीकडे आपण एकात्मता ध्येय व उद्दिष्टे यांची सांगड करतो परंतु कोण्या एकाने अमुक- तमुक करू नये. ज्या कोणी हा लेख किंवा मत प्रदर्शन केले असेल तर तुमचा समाज चुकीचा आहे मी तर म्हणेन हा गैरसमज आहे... आजच्या शतकीय क्रांतीने औद्योगिक प्रगती साधत असताना आपणास असे विचार येणे किती बरोबर आहे ह्याचा विचार करण्याची वेळ आली आहे. जसे तुम्ही स्वतः ला सुजाण, व शिक्षित समजता तसा आपला समाज सामाजिकता व त्यांचे चांगुलपणा जपत आहे ह्याचा अर्थ तुम्हाला जे सांगायचे हे त्याला समजत नाही हा तुमचा निव्वळ गैरसमज आहे.

अरे ! रे ! मे सुद्धा तेच करतोय का ? असा मला प्रश्न पडला. पण काही समज-गैरसमज समज वेळीच खोडून टाकले तर चांगले किंवा मग अश्या सज्ञान लोकांना विचाराचा डोसच गरजेचा असतो.

माझ्या मते दिवाळी अशी साजरी करावी:

उठा उठा दिवाळी आली..... फटाके वाजवा अगर वाजवु नका पण ह्या दिवाळीत,
मुलं किल्ला बनवत असतील तर अडवू नका, आणि बनवत नसतील तर बनवायला लावा,
आणि शक्य असेल तर या सुट्टीत एका तरी खऱ्या किल्ल्यावर मुलांना घेऊन जाऊन या,
आणि हो गेला तर कचरा करू नका, आणि कचरा दिसला तर उचलायला विसरू नका.





**!! जय शिवराय !!**

मित्रांनो आयुष्यात काही तर चांगले करायच, तेच तेच नको.... विचार करा. सणांचे स्वतः चे असे वेगळे महत्व आहे आणि त्याच्याबद्दल मतप्रदर्शन करण्या इतपत आपण साहजिकच मोठे झालेलो नाही. राहिला प्रश्न प्रदूषणाचा तर दिवाळी सणाचे होणारे प्रदूषण हे वर्षच्या तुलनेत अंदाजे ०.२७% आहे आणि राहिलेले बाकीचे ९९.७३% पूर्ण वर्षभरात होते. ह्याचा विचार तुमच्या मनात आला की नाही. आणखी असे बरेच सण आहेत जिथे ध्वनी, वायू प्रदूषण होते मग तेव्हा तुमचे विचार लेख कुठे असतात ?

हल्ली ! एक मुद्दा प्रकर्षाने जाणवतो आणि तो म्हणजे " जेव्हा तुम्ही ऑनलाईन नसता तेव्हा तुमच्या कामात व्यस्त होता, परंतु जेव्हा तुम्ही ऑनलाईन असता तेव्हा धर्म, जात, सहिष्णुता, बहिष्कार, आणि अश्या बऱ्याच गोष्टी जाग्या होतात".

मित्रांनो विचार करा आपले समज-गैरसमज समाज जागरूक तेचे असतील तर खरंच चांगले आहेत पण गैरसमज जातून लिहिलेले विचार खूप वाईट !

तुम्ही ठरवा समजून जगायचे किंवा मग समजून गैर वागायचे....विचार करा.. धन्यवाद !

# ४. लघुकथा : गैरसमज

गैरसमज' याचा नेमका अर्थ काय? गैरसमज म्हणजे योग्य समज करून घेण्यात आलेले अपयश. एखादा तंटा, मतभेद, एखादे बोलणे, वागणे, भूमिका, दृष्टिकोन यांचे योग्य ते अवलोकन करण्यात वा त्यांचा अर्थ लावण्यातली चूक. एखाद्या शब्दाचा, प्रसंगाचा, हेतूचा चुकीचा अर्थ लावून त्यावर दृढ विश्वास ठेवणे, असाही त्याचा अर्थ असू शकतो. या सर्व शाब्दिक अर्थामध्ये अपयश, चूक या शब्दांवरून ही मन:स्थिती नकारात्मक आहे, हे वेगळे सांगायला नकोच. गैरसमजाला थारा द्यायला मदत करणारे घटक कोणते, ते पाहू या.




दोन व्यक्तींतील चर्चेची भाषा भिन्न असल्याने एकाला दुसऱ्याची भाषा न समजल्याने गैरसमज निर्माण होऊ शकतात. या अडचणीपलीकडे मुळातच संवाद नसणे वा अपूर्ण स्वरूपाचा असणे, किंवा अयोग्य संवादशैलीचा वापर यानेही गैरसमज होऊ शकतात. गैरसमज बऱ्याचदा आपल्या अंगवळणी पडलेला असतो. एखादा शब्द, वाक्य, भूमिका, दृष्टिकोन, घटना वा व्यक्तीबाबत चटकन् काहीएक 'समज' करून घेऊन त्याचे गैरसमजात रूपांतर होत असावे. वारंवार ही प्रक्रिया घडल्यास मग गैरसमज हीच स्वाभाविक प्रतिक्रिया- response of convenience and compulsion ठरत असावी.

गैरसमज जसा सुलभ तसाच सर्वव्यापी आहे. गैरसमजामुळे व्यक्तीची मानसिकता, 'स्व'त्वाच्या कल्पना, करीअर व परस्परसंबंधांतील सौख्य, सबुरी, विश्वास, आत्मीयता, आशा, इच्छा यांना ठेच पोहोचते. त्यांच्यात अंतराय निर्माण होतो. भांडणे होतात. त्याने प्रगती खुंटते.

आपल्या आयुष्यावर अधिराज्य गाजवणाऱ्या या गैरसमजांना ठाम नकार देणे गरजेचे आहे. खरं तर प्रथम त्याची निर्मितीच होऊ देऊ नये. अनवधानाने वा दुर्लक्षामुळे किंवा अज्ञानामुळे तो झालाच, तर दीर्घकाळ त्यास थारा देऊ नये. यासाठी योग्य ती पावले वेळीच उचलणे फायद्याचे ठरेल. गैरसमज दूर ठेवण्यासाठी प्रथम आपल्या वैचारिक चुका (बऱ्याचदा अनवधानाने वा त्याच्या असण्याबद्दलच्या अज्ञानामुळे होणाऱ्या) टाळायला हव्यात. ॲरोन बेक, अल्बर्ट एलीस यांच्यासारख्या दिग्गज मानसोपचारतज्ज्ञांच्या वर्षानुवर्षांच्या संशोधनातून सिद्ध झालेले हे ज्ञान (वैचारिक चुकांबद्दलचे) समजून घेऊ या.

वैचारिक चुका या काही विशिष्ट व अयोग्य विचार, भावना व वर्तनशैलीतून घडतात आणि गैरसमजास

निमंत्रण देतात. यास्तव आपल्या हातून चूक तर होत नाहीए ना, हे आधी पडताळून पाहावे. केवळ दोन टोकांचा विचार करणे, त्यामुळे सुवर्णमध्य न साधता येणे, हे किंवा 'ते' च.. अधेमधे काहीच नाही, त्यामुळे सर्व बाबींच्या विचारांकडे दुर्लक्ष, आपल्या सोयीनुसार प्रसंग किंवा समोरच्याच्या हेतूचा/ शब्दांचा अर्थ लावणे, शंका घेणे, समोरच्या व्यक्तीच्या हेतू वा भूमिकेवर थोडक्या किंवा अज्ञात माहितीच्या आधारे त्वरित निष्कर्षाप्रत येणे, आपण दुसऱ्याचे मन सहज आणि योग्यच वाचू शकतो असा भ्रम वा ग्रह करून घेण, छोटय़ा छोटय़ा गोष्टींचा बागुलबुवा करणे, सत्य पडताळून न पाहता सहज उपलब्ध माहितीवर (योग्य-अयोग्यतेची छाननी न करता) विसंबून इतरांशी वागणे व बोलणे बदलणे, इतर व्यक्तींप्रति पूर्वग्रहदूषित विचार व वर्तन.. या व इतर वैचारिक साशंकतेमुळे आपल्याला बऱ्याचदा सुस्पष्ट दृष्टी ठेवणे कठीण जाते. त्यामुळे ग्रह करून घेऊन, तो योग्य की अयोग्य पडताळून न पाहणे; किंबहुना मी केलेला विचार योग्यच आहे, या अहंभावातून निर्माण झालेल्या विचाराला छेद देणे आपण टाळतो. या कारणांमुळेच गैरसमज झालेल्या घटनेशी किंवा व्यक्तीशी आपले आपुलकीचे वा आत्मीय संबंध नसतात/ राहत नाहीत.





ह्याचमुळे कदाचित आपण आपले नातेवाईक, मित्र-मंडळी असे सर्व काही काळात-नकळत गमावून बसतो आणि जेव्हा आपणास खरोकर त्यांची गरज असते तेव्हा आपण एकटे पडतो.  म्हणून चुकीच्या विचारातून पुढे न जाता थोडे थांबून, समजून वागल्याने आपणास आयुष्याचा खरा आनंद घेता येईल....प्रसंगावधान वाढवा आणि गैरसमज कमी करा.

धन्यवाद !

# ५. सुविचार कथा : समज- गैरसमज

शांत असणे म्हणजे आक्रमक नसणे...

असा गैरसमज माझ्याबाबतीत अनेकांचा होतो.......

नेहमी तुमचे सर्वोत्तम प्रयत्न करा आणि हे करून देखील ते तुमची कदर करत नसतील तर तो त्यांचा दोष आहे तुमचा नाही

जीवनात वेळ कशीही असो, वाईट किंवा चांगली ती नक्की बदलते पण,

चांगल्या वेळेत वाईट काम करू नका. जेणे करून वाईट वेळेत लोक सोडून जातील.

अच्छे दोस्तो कि तलाश हम नही करते. हम तो जीसे दोस्त बनाते है वो ही हमारे लिए अच्छे बन जाते है.

जो बात दिल में है उसे बोलने की हिम्मत रखो और जो बात किसी के दिल में है उसको समझने कि समज रखो

ज्या लोकांनी गैरसमज करून मला दूर केले त्यांना समजावण्याची गरज वाटत नाही.

**रिश्ते** वो नही, जिसमे रोज बात हो,
रिश्ते वो भी नही, जिसमे रोज साथ हो.

रिश्ते तो वो है जिसमे, कितनी भी दूरिया, लेकीन दिल हमेशा, उनकी याद हो

# ६. आभार : समज-गैरसमज

आयुष्य फार सुंदर आहे आणि जर तुम्हाला त्याचा आनंद घायचा असेल तर **समज-गैरसमज** या चक्रातून बाहेर पडा आणि मग बघा...काय होते ते !

**समज-गैरसमज** हे शब्द लाल रंगाने लिहिले आहे कारण ते खरोखर प्रत्येकाच्या आयुष्यात डेंजर साईन म्हणून येतात. आम्ही अशी आशा करतो की तुम्हाला आमचा हा प्रयत्न नक्कीच आवडला [हा आमचा..समज], असेल जर तुम्हाला खरंच आवडला असेल, तर एक छोटेसे काम करा...तुमच्या जवळ असणाऱ्या कोणत्याही आश्रम शाळेला किंवा एखाद्या गरजू-विद्यार्थाला वही-पेन साठी रुपये ३०/- ची मदत करा [कृपया गैरसमज करून घेवू नका]. ...शेवटी निर्णय तुमचा आहे !

धन्यवाद !

मी मराठी

दत्तात्रय कृष्णा निकम



मी, दत्तात्रय कृष्णा निकम, मूळचा सातारा जिल्ह्यातील तालुका खटाव रहाटणी गावाचा, कामानिमित्त मी मुंबईत माझ्या कुटुंबासोबत पारसिकनगर कळवा ठाणे येथे वास्तवास आहे. मी स्वतः इंस्ट्रुमेंटेशन इंजिनिअर असून एका प्रायव्हेट कंपनीत " ऑईल अँड गॅस " डिजाईन सेंटर मध्ये सिनियर प्रिंसिपल इंजिनीअर म्हणून कार्यरत आहे.

मला स्वतःला वाचन , लेखन , क्रिकेट खेळणे, समाजसेवा यात प्रामुख्याने रस आहे. मला वाचनाची आवड आहे व मी माझ्या आयुष्यात लेखनाचे काम सुद्धा केले आहे प्रामुख्याने मराठी लिखाण / साहित्य केले आहे.

मला माझ्या वाचनाच्या आवडीने मराठी, हिंदी व इग्रंजी साहित्य, वेग-वेगळ्या प्रकारचे लेख, कथा, आत्मचरित्र वाचण्याच्या संधी मिळाल्या. त्यात माझी आवड प्रामुख्याने मराठी साहित्य, विविध मराठी साहित्यिक वाचायला मिळाले. माझ्या वाचनाची सुरुवात श्री. पु. ल. देशपांडे, श्री.मंगेश पाडगांवकर, श्री. प्र. के. अत्रे आणि अश्या बऱ्याच मान्यवरांच्या लेखनाने झाली. मी आतापर्यंत वाचलेल्या पैकी बटाट्याची चाळ, तो मी नव्हेच असो किंवा मग सांगा आता कसे जगायचे खुपच प्रभावित करून गेले.

मी लिहिलेल्या माझ्या कविता - मन, नाद-खोडकर बंड्या, सांगा आता कसे जगायचे आधारित संकल्पना, चारोळ्या, लेख - भारत एक्सप्रेस, विचार, प्रवास वर्णन असे साहित्य मी सिंगापुर ला असताना महाराष्ट्र मंडळ, सिंगापूरच्या विविध मराठी कार्यक्रमात – शब्दगंधा असो किंवा मग ऋतुगंध त्रैमासिक किंवा मग गणेशोस्तव स्मरणिका मध्ये प्रसिद्ध झालेल्या आहेत मी मराठी ...दत्तात्रय कृष्णा निकम या नावाने. तसेच माझे स्वतःचे विचार मांडण्यासाठी मी सुरु केलेला माझा मराठी ब्लॉग इंडिअन प्राऊड.....भारतीयांचा अभिमान (https://indianproud.blogspot.in). हो थोडे वर्ष हा ब्लॉग बंद होता कारण तेव्हा मी माझ्या एका अभियांत्रिकी विषयाच्या

पुस्तकावर काम करीत होतो. " Fundamentals of Project planning and Engineering" for final year Instrumentation Engineering च्या विद्यार्थ्यांसाठी ह्या जून -२०१७ महिन्यात प्रकाशित झाले. हे पुस्तक मुंबई विद्यापीठाच्या इंस्ट्रुमेंटेशन इंजिनीरिंग च्या आठव्या सेमिस्टर मध्ये वापरले जाणार आहे.

पण म्हणतात ना मराठी प्रेम तुम्हाला नेहमीच काहीना काही नवीन करण्याची प्रेरणा देतात माझे ही तसेच झाले असेल कदाचित कारण आजकालची सामाजिक परिस्थिती पाहून मी स्वतः खालील विषयावर काही शॉर्ट फिल्म्स सुद्धा बनविल्या आहेत. तसेच माझ्या मित्रांसाठी काही सामाजिक जागरुख्ता विषयावर "स्क्रीप्ट-नेरेशन" चे काम सुद्धा करीत आहे.

- प्रवास आयुष्याचा,
- माझ्या राजा रे..छत्रपती,
- इन्शुरन्स विश्वासाचा

तसेच मी माझ्या "समज-गैरसमज" ह्या विषयावर लिखाण पूर्ण केले असून, सध्या "प्रवास आणि परिचय - पासपोर्ट आठवणींचा " आणि "व्हाट्सअँप...... आविष्कार की विकार" या पुस्तकामावर विषयवार काम करीत आहे.

मी स्वतःला खूप भाग्यवंत समजतो कारण मला माझे प्रोफेशन सांभाळून मराठी साहित्य किंवा मग सामाजिकता साठी काम करण्याची संधी मिळाली. मला वाटते प्रत्येकात एक कलाकार लपलेला असतो काही लोकांना तो कळतो काही लोक कळून न कळल्यासारखे वागतात काही जणांना मग कदाचित काळतही नसेल परंतु सर्वांना एक सांगेन प्रत्येकाने आपल्यातील कलाकार ओळख आणि मग पहा आयुष्य किती मजेदार होते ते.....

धन्यवाद् !

मी मराठी

ई साहित्य प्रतिष्ठान

मराठी सिनेमा हा एकेकाळी भारतात हिंदी सिनेमाच्या तोडीस तोड किंवा काकणभर वरचढच होता. मध्यंतरी मराठी सिनेमाला उतरती कळा लागली. प्रेक्षक येईना. म्हणून थिएटर मिळेना. थिएटरच मिळत नाही म्हणून चांगले मराठी सिनेमा बनेनात. आणि चांगले सिनेमा नाहीत म्हणून प्रेक्षक मिळेनात. असे एक दुष्टचक्र सुरू झाले. मग आला झी मराठी सिनेमा. आणि त्याच्याच जोडीने छोट्या आकाराची मल्टीप्लेक्स आणि डिजिटल प्रक्षेपण. त्यामुळे पुन्हा एकदा मराठी सिनेमा जोमाने बहरू लागला.

काहीशी अशीच परिस्थिती मराठी साहित्याचीही होत आहे. एकेकाळी टॉपला असलेले मराठी साहित्य मधल्या काळात टिव्ही आणि सिनेमाच्या युगात मागे पडले. पण आता मोबाईल आणि इंटरनेट यांच्यामुळे मराठी वाचकवर्ग फ़ार मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे. आणि त्याच जोमाने त्यांच्यासाठी लिहिणारा दर्जेदार लेखक वर्गही निर्माण होऊ लागला आहे. मराठी साहित्याच्या भविष्याबद्दल आम्ही अत्यंत आशावादी आहोत.

आपली साथ मात्र पाहिजे. आपल्या ओळखीच्या जास्तीत जास्त लोकांना ई साहित्य बद्दल सांगा. त्यांचे ई मेल पत्ते व whatsapp नंबर कळवा. त्यांना ई साहित्यचं मोबाईल app download करायला सुचवा. आग्रह करा. ई साहित्यचे मार्केटिंग करा. एकदम फ़्रंट फ़ुटवर येऊन खेळू. जबरदस्त मार्केटिंग करू. लाखांचे कोटी करू आणि मराठी साहित्य पुन्हा नंबर वन ला आणू.

ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahitya. com

esahity@gmail. com

आता ई साहित्य चे APP उपलब्ध आहे. ई साहित्यचं App आपण खालील लिंकवरून आपल्या मोबाईलवर डाऊनलोड करा आणि भरमसाट पुस्तकं फ़्री वाचा. https://play. google. com/store/apps/details? id=com. esahity. www. esahitybooks

ई साहित्य प्रतिष्ठानची ई बुक्स Whatsapp broadcast service सुरू झाली आहे. पूर्णपणे फ़ुकट पुस्तकं आता आपल्या मोबाईलवर थेट. कृपया नांव नोंदणीसाठी 7710980841 हा नंबर आपल्या मोबाईलवर सेव्ह करा आणि नंतर या नंबरवर वॉट्सऍप करून आपले नांव व शहराचे नांव कळवा. आपल्याला नियमितपणे एक नवीन मराठी ई पुस्तक Whats app द्वारे पाठवले जाईल. आपण ते पुस्तक आपल्या मित्रांना Whatsapp करा आणि भाव खा.

आपल्या ओळखीच्या किमान दहा लोकांचे मेल आय डी आम्हाला कळवा. त्यांना आम्ही विनामूल्य पुस्तके पाठवू. व आपल्याला VIP सभासद बनवले जाईल.